MHBU010011842024

**विशेष खटला क्र. ६५/२०२४**

सरकार-वि-रत्नाकर शामराव डोईफोडे

**कलम १३५ भारतीय विद्युत कायदा**

## आदेश नि.क्र ०३

( पारित दिनांक १७ ऑगस्ट २०२४)

१. प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपीवर असा आरोप करण्यात आला आहे की, त्याने १३५ भारतीय विद्युत कायदा,२००३ नुसार गुन्हा केलेला आहे. दोषारोप पत्र दाखल झालेले आहे. आरोपीच्या म्हणण्यानुसार नुसार त्याने कोणताही गुन्हा केलेला नाही. अश्या परिस्थितीमध्ये त्याने नियमीत जामीन अर्ज सादर केला आहे. सरकारी विधीज्ञ श्री एस.पी.हिवाळे यांनी त्या अर्जाला विरोध दर्शविला. दोन्ही पक्षांना ऐकले.

२. हयाबाबत वाद नाही की, आरोपीवर ठेवलेला आरोपाविषयीचा गुन्हा हा समझोत्यावर प्रकरण निकाली काढणेजोगा आहे. आरोपी हा दुसरबिड, ता.सिंदखेडराजा, जि.बुलडाणा येथील राहणारा आहे. त्यामुळे त्याची पळून जाण्याची शक्यता फार कमी आहे. जेव्हा तपास पुर्ण झालेला आहे व दोषारोपत्र सादर झालेले आहे, अश्या परिस्थितीमध्ये आरोपीचा जामीन अर्ज नाकारुन काहीही साध्य होणार नाही. करिता आरोपी हा जामीन मिळण्यांस पात्र आहे. करिता खालील आदेश पारीत करण्यांत येते.

## आदेश

१. आरोपी रत्नाकर शामराव डोईफोडे यांचा जामीन अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. आरोपीला रुपये १५०००/- रुपयांच्या वैयक्तीक जामीन मुचलक्यावर व तेवढयाच रकमेच्या त्यांच्या जमानतदाराच्या जामीन मुचलक्यावर

सोडण्यांत यावे.

३. आरोपीने जामीनचा दुरुपयोग करु नये.

Digitally signed by RAJENDRA NARAYANRAO MEHARE
Date: 2024.08.17 13:28:59 +0530

( आर.एन.मेहरे)

दिनांक १७.८.२०२४

न्यायाधीश,

विशेष न्यायालय, बुलडाणा